आयएसपी प्रेसला 'सीएमडी' पुरस्कार

नाशिकरोड । प्रतिनिधी

ब्रिटीश काळापासून पासपोर्ट, चेकसह सरकारी दस्तऐवजांची छपाई करणाऱ्या नाशिकरोड येथील आयएसपी प्रेसला उत्कृष्ट कामगिरीसाठी राष्ट्रीय स्तरावरील सीएमडी पुरस्काराने गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथे प्रेस महामंडळाच्या मुख्यालयात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन, अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रेस मजदूर संघाचे सरचिटणीस जगदीश गोडसे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जुंद्रे, उपाध्यक्ष राजेश टाकेकर यांनी स्वीकारला. देशभरात प्रेस महामंडळाच्या नऊ प्रेस आहेत. त्यापैकी नाशिकरोड प्रेसला पुरस्कार मिळणे ही अभिमानाची व गर्वाची बाब आहे, असे गोडसे यांनी नमूद केले. प्रेस महामंडळाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक विजयरंजन सिंह, संचालक एस. के. सिन्हा, टी. नागराजन, सीएनपीचे मुख्य महाव्यवस्थापक डी. के. रथ, आयएसपीचे राजेश बन्सल, प्रेस मजदूर संघाचे उपाध्यक्ष कार्तिक डांगे, स्टाफ युनियनचे सरचिटणीस राहुल रामराजे, कार्याध्यक्ष रवींद्र गोजरे आदी उपस्थित होते.

बहुतांश विकासकांना अंतरिम जामीन

डायोसेशन फसवणूक प्रकरण; संशयितांची चौकशी सुरू

नाशिक। प्रतिनिधी

शररणपूर रोडसह गावठाणाची सुमारे तीनशे कोटी रुपये मूल्याची जमीन परस्पर बळकवण्याच्या दाखल गुन्ह्यात सदतीसपैकी सतरा संशयित बिल्डर, उद्योजकांना न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. दरम्यान सरकारवाडा पोलिसांनी या गुन्ह्याच्या तपासास गती दिली असून संशयितांना लवकरच चौकशीसाठी बोलविण्यत येणार आहे. दुसरीकडे पुरावे संकलित करण्यासाठी तपास पथकाने महसूल व उपनिबंधक कार्यालयात फेऱ्या सुरु केल्या आहेत.

शरणपूर रोडवरील काही भूखंड व जुन्या पोलीस आयुक्तालयाची जागा संशयितांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे लाटल्याचे अनेक तक्रार अर्ज व प्राथमिक तपासात उघड झाले होते. त्यानुसार, आयुक्तालयाच्यावतीने सहायक निरीक्षक तुषार देवरे यांनी सरकार पक्षाच्या वतीने फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार नाशिकमधील बडे उद्योजक व बांधकाम व्यावसायिक, त्यांची कुटुंबे व काही एजंटांवर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ निरीक्षक सुरेश आव्हाड यांनी तपास सुरु करुन आता संशयितांची चौकशी करणार असल्याचे सांगितले आहे. इतक्या मोठ्या गैरव्यवहारात नाव आल्याने अनेक संशयितांनी सुटका करवून घेण्यासाठी नानाविध मार्ग अवलंबिल्याचे समजते.

कार्यक्षम जिल्हाधिकाऱ्यांची गरज

सन २००२ मध्ये नाशिक येथे जिल्हाधिकारी म्हणून रुजू होण्यापूर्वी महसूल यंत्रणेच्या संगनमताने अनेक विद्रूप जमीन घोटाळे बिनदिक्कतपणे सुरू होते. त्या सर्वांवर निर्णायक कारवाई केली. त्यापैकी डायोसेशन ट्रस्टच्या जमिनीबाबतचे एक मोठे प्रकरण होते. त्यात ट्रस्टचे पदाधिकारी, भू-माफिया, धर्मादाय आयुक्तालयातील अधिकारी आणि महसूल यंत्रणेचे संगनमत होते. म्हणूनच या प्रकरणावर सीआयडीमार्फत चौकशी व्हावी, अशी विनंती शासनाकडे केली होती. आज, तब्बल २२ वर्षांनी का होईना, त्या प्रकरणात कारवाई होत आहे. राज्यातील महसूल विभागात अशी अनेक प्रकरणे अजूनही आहे. फक्त जागृत आणि कार्यक्षम जिल्हाधिकाऱ्यांची गरज आहे, असे ट्विट अन्न व औषध प्रशासनाचे माजी आयुक्त महेश झगडे यांनी 'एक्स' वर केले आहे.

सेवानिवृत्त जवानांचा सत्कार

देवळाली कॅम्प । लहवीत येथील शिवशक्ती मित्रमंडळ व राजमुद्रा स्मारक समितीच्या वतीने शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्ताने लष्कराच्या तिन्ही दलातील सेवानिवृत्त जवानांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जवानांना छत्रपतींची पालखी घेण्याचा मान देण्यात आला. तसेच या पालखीसाठी वारकरी दिंडी ज्ञानेश्वर महाराज तुपे बेलू यांच्या गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी काढली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कॅन्टोन्मेट बोर्डाचे नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे, रामकृष्ण महाराज लहवितकर, एअर फोर्स स्टेशनचे अधिकारी एम. व्ही. कुमार, सरपंच सत्यभामा लोहेकर आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रवीण पाळदे, वैभव पाळदे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष संपतराव काळे, पी. एल. गायकवाड, आजी-माजी सैनिक, नागरिक उपस्थित होते.

२६ ते २८ डिसेंबरदरम्यान नाशकात चौथे विश्व मराठी संमेलन

(पान १ वरून) विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, समीक्षक डॉ. रमेश वरखेडे, उद्योजक धनंजय बेळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, साहित्यिक उपस्थित होते.

संमेलनाचे कार्यालय नाशिक येथे १६ ऑगस्ट २०२५ पासून कार्यान्वित होईल. या कार्यालयातून संमेलन तयारीचा नियमितपणे आढावा घेण्यात येईल. संमेलनाच्या प्रचार-प्रसारासाठी दरमहा विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, असेही सामंत यांनी सुचवले. संमेलनात अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असेल, असे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एअर इंडियाचे विमान कोसळले

पुस्तक आदान-प्रदान उपक्रम

विश्व मराठी संमेलनात पुस्तक आदान-प्रदान उपक्रम असेल. या वर्षाच्या सुरुवातीला पुणे येथे झालेल्या संमेलनात हा उपक्रम राबवण्यात आला होता. त्याला वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. पुणे संमेलनात ३५ हजार वाचकांनी उपक्रमात सहभाग नोंदवला. नाशिकला हा सहभाग एक लाखापर्यंत जाईल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी व्यक्त केला.

इस्त्रायलचा इराणवर हल्ला

(पान १ वरून) केला. तसेच इराणी लष्करी आणि अणुतळांनादेखील लक्ष्य केले आहे. आयएएफच्या डझनभर फायटर विमानांनी इराणवरील हल्ल्याचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे. ज्यात इस्त्रायलने इराणच्या विविध भागातील अण्वस्त्र ठिकाणांसह डझनभर लष्करी तळांवर हल्ले केले. इस्त्रायल डिफेन्स फोर्सेसच्या माहितीनुसार, तब्बल २०० हून अधिक लढाऊ विमानांचा वापर करून इराणमधील विविध ठिकाणी हल्ले करण्यात आले. त्यात इराणचे आणीबाणी नियंत्रण कमांडरही ठार झाले आहेत. या तिघांनाही आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठा हिंसाचार घडवण्यात जबाबदार धरले जात होते.

सध्याच्या घडीला इराण अण्वस्त्र निर्मितीच्या अगदी जवळ आहे. इराणी राजवटीच्या हातात असलेली मोठ्या प्रमाणातील विनाशकारी शस्त्रे इस्त्रायल राष्ट्रासाठी आणि संपूर्ण जगासाठी धोकादायक आहेत. याच कारणातून इस्त्रालयने इराण-वर हल्ला केला आहे. त्यासाठी इस्त्रालयने लष्करी तळे आणि अण्वस्त्र ठिकाणांना लक्ष्य केले आहे. या तळांचे मोठे नुकसान करण्यात इस्त्रायल यशस्वी ठरला आहे. डॉ. मोहम्मद तेहरांची आणि डॉ. फेरेयदून अब्बासी या दोन अण्वस्त्र वैज्ञानिकांचा हल्ल्यात मृत्यू झाला. त्यामुळे इराणच्या अणुबॉम्ब विकसित करण्याच्या कार्यक्रमाला खीळ बसणार आहे.

इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर इराणच्या राजधानीत तेहरानमध्ये जोरदार स्फोट झाले. शहरभर धुराचे लोट दिसून आले. यानंतर इस्त्रायलचे संरक्षण मंत्री इस्त्राइल कात्झ यांनी संपूर्ण देशात विशेष आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे. शाळांना बंद ठेवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्याला इराण काय प्रत्युत्तर देणार, याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे. इराणने आक्रमक भूमिका घेतली तर जगात आणखी एका युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मराठी भाषा अधिकारी कोण?... मंत्री कडाडले

(पान १ वरून) अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तीन वर्षांपूर्वी प्रत्येक शासकीय कार्यालयात मराठी भाषा अधिकारी नेमण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला होता. राजभाषा अधिनियमाचे पालन होते की नाही? सरकारी कार्यालयांत मराठी भाषेचा वापर योग्य प्रकारे होत आहे का? मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबवणे यासाठी मराठी भाषा अधिकारी नेमले जाणार होते. मात्र, सरकारच्या या निर्णयाची तेवढ्या गांभीर्याने अंमलबजावणी झालेली नसल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. राज्यात जिल्हानिहाय किती मराठी भाषा अधिकारी नेमले गेले? याची माहिती नाही. नाशिक जिल्ह्यातसुद्धा सरकारच्या या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, ही बाब मंत्र्यांनी विचारलेल्या प्रश्नाने अधोरेखित झाली. त्यामुळेच मंत्री सामंत यांचा संताप अनावर झाला.

निवृत्तिनाथ महाराजांच्या पालखीचे नाशिकरोडला स्वागत

नाशिकरोड । प्रतिनिधी

त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे निघालेल्या श्री संत निवृत्तिनाथ महाराजांच्या पालखीचे नाशिकरोड येथे भव्य स्वागत करण्यात आले. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी व नागरिकांनी तसेच महिलांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

श्री संत निवृत्तिनाथ महाराजांची पालखी मंगळवारी त्र्यंबकेश्वर येथून निघाल्यानंतर शुक्रवारी दुपारी नाशिकरोड येथे या पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. पालखीच्या स्वागतासाठी नाशिकरोड परिसरातील विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते तसेच महिला भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखीमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना याप्रसंगी विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी भोजनाची पाकिटे, पाण्याच्या बाटल्या तसेच फराळाचे साहित्याचे वाटप केले. या पालखीमुळे संपूर्ण नाशिकरोड परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

ही पालखी दत्त मंदिर चौकात पोहोचताच त्या ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर बिटको चौक येथे पालखी आली असता तिथेही भाविकांनी स्वागत करून पालखीचे दर्शन घेतले. त्यानंतर ही पालखी मुक्तिधाम येथे आल्यानंतर त्या ठिकाणी पालखीचे भक्तीभावाने पूजा करण्यात आली. पालखीमुळे वाहतुकीचे कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक इतर मार्गाने वळविण्यात आली होती. जेलरोड, बिटको चौक, सिन्नर फाटा उड्डाणपूल या ठिकाणी वाहनांच्य मोठ्या रांगा लागल्या होत्या. दोन ते अडीच तास मुक्तिधाम येथे पालखी थांबल्यानंतर पालखी सिन्नर फाटा मार्गे पळसे येथे रवाना झाली.

ही पालखी पळसे येथे मुक्कामी राहणार असून, त्यानंतर ही पालखी सिन्नरकडे शनिवारी प्रस्थान करणार आहे. याप्रसंगी सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, अशोक गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

पोलीसही झाले वारकरी

या पालखीमध्ये भाविक ज्याप्रमाणे मोठ्या संख्येने पांढरी टोपी घालून सहभागी झाले होते, त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी सुद्धा खाकी ड्रेस व पांढरी टोपी घालून या पालखीमध्ये सहभागी होऊन भक्तीने तल्लीन झाले होते. तसेच, पालखीतील वारकऱ्यांना पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात सहकार्य करण्यात येत होते तर अनेक पोलीस पालखीतील वारकऱ्यांचे पदस्पर्श करून आशीर्वाद घेत होते.

मराठा उद्योजकांचे व्यावसायिक प्रदर्शन

नाशिक । मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास मार्गदर्शन संस्थेतर्फे शनिवारी (दि.१४) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेज गंगापूर रोड येथे उद्योजकांचे व्यावसायिक प्रदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे.

सकाळी साडेआठ वाजता मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, क्लिंस्टन क्लबचे अध्यक्ष विक्रांत मते, प्राचार्य प्रशांत पाटील यांच्या हस्ते होणार असून दुपारी दीड वाजेपर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे. यावेळी नेटवर्किंगची संधी उद्योजकांना मिळणार आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष उल्हास बोरसे, विभागीय अध्यक्ष विशाल देसले, प्रदर्शनाचे नियोजक दत्ता भालेराव, प्रणिता गायकवाड, संस्थेचे सरचिटणीस माधव मुधाळे, उपाध्यक्ष डॉ. संदीप बोरसे, जिल्हा समन्वयक दीपक भदाणे, क्रांती बेडसे, अरविंद देशमुख, सागर तारडे, सुनील घुले, उमेश शिंदे यांनी केले आहे.

शेतीमाल, वाहनचोरी करणारे जेरबंद

पंचवटी । प्रतिनिधी

शहरासह जिल्ह्यात शेतीमाल व वाहनांची चोरी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून महिंद्रा कंपनीच्या तीन पिकअप गाड्या, होण्डा कंपनीची एक दुचाकी व दोन मोबाईल फोन जप्त केले. पोलिसांनी चोरांच्या पिकअपला शिताफीने जीपीएस लावला होता. त्यामुळे त्यांची हालचाल पाहून पोलिसांनी ही कार्यवाही केली. याप्रकरणी म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

याबाबत, पंचवटी विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त पद्मजा बढे यांनी पत्रकार परिषदेत शुक्रवारी (दि.१३) यांनी माहिती दिली.

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१७८६८	६००	२१००	१६००
विंचूर	१३९०३	५००	२०२१	१६००
निफाड	३२५०	५००	२०००	१७००
सायखेडा	१९४०	७००	१७२१	१५५०
पिंपळगाव	२१०००	८००	२५०८	१६५०

बाजार समित्यांत कांदा दर स्थिर

नाशिक । प्रतिनिधी

लासलगाव, पिंपळगाव या बाजार समित्यांमध्ये शुक्रवारी (दि.१३) कांद्याची आवक स्थिर होती तसेच कांदा ीावामध्येही फार काही बदल झालेले नव्हते. मात्र, निफाड, सायखेडा, विंचूर या आवारांमध्ये काद्याची आवक काल थोड्या प्रमाणात वाढलेली होती. जिल्ह्यात काल रात्रीपासून पाऊस झाल्याने त्याचा परिणाम कांदा आवकेवर होईल, असे बोलले जात होत. मात्र, त्याच्या विपरित कांदा आवक बाजारांमध्ये वाढलेली होती. त्यामुळे कांदा विक्रीकडे शेतकऱ्यांचा कल असल्याचे दिसून येत होते.

इसुझू मोटर्सचे शिबिर

मुंबई । इसुझू मोटर्स इंडियाच्या वतीने देशभरात 'इसुझू आय-केअर मान्सून कॅम्प' या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. इसुझू डी-मॅक्स पिकअप्स आणि एसयूव्ही श्रेणीसाठी असलेल्या या शिबिराद्वारे ग्राहकांना आकर्षक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.'इसुझू केअर' या उपक्रमाअंतर्गत दि.१६ ते २१ जून या कालावधीत सर्व इसुझू अधिकृत डीलर सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत ग्राहकांना त्यांच्या वाहनांसाठी खास ऑफर्स आणि फायदे मिळणार असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

आयएफएल एंटरप्रायजेसचा आयपीओ

मुंबई । कृषी वस्तूंच्या आयात, निर्यात आणि व्यापारासह कृषी वस्तूंच्या व्यवसायात गुंतलेल्या आयएफएल एंटरप्रायजेस लि. चा ४९.१४ कोटी रुपयांचा राइट्स इश्यू १९ जून २०२५ रोजी खुला होणार आहे. इश्यू ३० जूनपर्यंत खुला राहणार आहे. प्रति शेअर किंमत १ रुपये आहे. यामुळे विद्यमान भागधारकांना कंपनीमध्ये त्यांची इक्विटी वाढवण्याची संधी मिळणार आहे. इश्यूमधून मिळणारे उत्पन्न कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांना पाठिंबा देण्यासाठी वापरले जाणार आहे.

आयुश आर्टची महसूल, नफावाढ

नाशिक । आयुश आर्ट अँड बुलियन लि. ही पूर्वीची एकेएम क्रिएशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या २०२५ च्या अर्ध वार्षिक आणि २०२५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणाचे एकत्रित वित्तीय निकाल घोषित केले आहेत. याद्वारे कंपनीची महसूल आणि नफ्यामध्ये लक्षणिय वाढ झाली आहे. कंपनीने कामकाजामधून ७३.७७ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला आहे.

शब्दकोडे : २७६



आडवे शब्द : १) तेजोहीन, फिका. ४) छोटे कुबड. ६) लग्नघरातील एक कार्यक्रम, एक वाक्प्रचार ९) दुसऱ्याची वस्तू लुबाडणे. १०) रानरेडा. ११) सासरा. १२) निद्रा. १३) लक्ष वेधून घेणारे (कृत्य). १५) जप जाप्य. १७) नमस्कार. १९) अडाणी माणसात अर्ध शिक्षित माणसाला मान असतो या अर्थाची म्हण. २३) लुबाडणारा (हिं.) २४) नवऱ्याचा भाऊ. २५) शहर. २६) पाण्याचा प्रवाह. २८) ज्वर. ३०) ऐट, रुबाब. ३१) गवत. ३२) पायापासून डोक्यापर्यंत. ३५) स्तुती करणारा. ३७) एक द्विदल धान्य. ३८) मच्छर. ३९) कांडण्याचा दगडी खल. ४०) पादत्राण. ४२).....? त्याची वाजवावी टाळी. एक म्हण. ४४) जंगलाची राणी. ४६) छोटा डोंगर. ४७) पुष्कळ. ४९) मीठ. ५१) चटकन. ५४) पवित्र. ५६) चंद्राची कड. ५७) एका बाजूस झुकणे. ५८) नुतन. ५९) व्रत. ६१) परीक्षा घेणारा. ६२) गाय. ६३) विश्रांती सुख देणारे.

उभे शब्द : १) नास्तिक. २) विष. ३) ज्यावर वस्त्राचे अच्छादन करण्याची सोय आहे असा पलंग. ५) गुरांचा घोळका. ६) भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर सीमेवरील चार राष्ट्रांची नावे. ७) खिडकी ८) वेगाने, चटकन. १२) कुटी. १४) लोक संख्येची मोजणी. १५) सांभाळ, रक्षण. १६) बिन वासाचे पांढरे फूल. १८) संन्यासाचे निवासस्थान. २०) शेवटचा भाग. २१) गावठी. २२) बाजार. २७) चांदणी. २९) गीत, गाणे. ३१) चक्र. ३२) दुभसिन. ३३) मृत्यू ३४) एक आसन ३६) शृंखला ३९) निषेध, मागणीसाठी केलेला उपास. ४१) निरुपाय झाल्याने माघार घेणे. ४३) अकस्मात. ४४) घरातील मोठी माणसे. ४५) निष्काळजी. ४८) मिठी, विळखा. ५०) स्निग्ध औषध. ५२) सोने. ५३) उप्पिटामधील गव्हाचा पदार्थ. ५५) यजमान. ६०) चाणक्य नितीतील पहिला उपचार.

शब्दकोड२७५चे उत्तर